विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील टप्पा-२ मध्ये नव्याने मंजुर केलेल्या २७८ अस्थाई पदांना मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ २०१७/ प्र.क्र.२४४/ आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १८ नोव्हेंबर , २०१७

<u>वाचा -</u>

1. **शासन निर्णय , सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक- पदनि २०१५/प्र.क्र.२७२/आरोग्य-३, दिनांक- २.०१.२०१७.**
2. **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३ /टे-५/ विसंसेरु अमरावती./अपदे-२६८/सन २०१७-१८/३३६५७/१७, दिनांक- १६.०९.२०१७.**

शासन निर्णय-

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र. १ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती, जि.अमरावती येथील २७८ अस्थाई पदे नव्याने मंजुर करण्यात आली आहेत.

२. संदर्भ क्र . १ येथील शासन निर्णयान्वये विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती, जि. अमरावती साठी मंजुर करण्यात आलेल्या २७८ अस्थाई पदांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१७- २०१८ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,

(०१)- नागरी आरोग्य सेवा -विषम चिकित्सा,

११०-रुग्णालये व दवाखाने,

११०-७ पंचवार्षिक योजनातंर्गत योजना-राज्या योजनांतर्गत योजना,

(०६) (२१)- मुफसल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी विशेष संदर्भ सेवा केंद्र स्थापन करणे,

(२२१० ४२५९)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दिनांक - ०३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११८१२५१३४५३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.18 14:31:44 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. संचालक, आरोग्यसेवा, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा(रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा(अर्थ व प्रशासन), पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
६. अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
८. वित्त विभाग,(व्यय-१३) मंत्रालय,मुंबई.
९. कार्यासन अधिकारी,सेवा-१सेवा-२/सेवा-३/सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय, मुंबई यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.
१०.निवडनस्ती (आरोग्य-३)